# छंद पुष्परचनेचा - इकेबाना ५

**शोका रचना** ---

इकेनोबो स्कूलमध्ये शोका रचना खूप महत्वाच्या मानल्या जातात. पुष्परचनांच्या इतिहासात रिक्का रचना प्रथम केल्या गेल्या. त्या करायला अवघड व त्यासाठी अनेक प्रकारच्या पाना-फुलांची जमवा जमव करावी लागते. तसेच त्याला वेळही खुप लागतो. त्यात सोपेपणा आणायच्या विचारातुन शोका रचनांचा जन्म झाला.

शोका रचना अत्यंत शास्त्रशुध्द पध्दतीने केल्या जातात. या रचना करताना निसर्गातील झाडाफुलांचा नैसर्गिक स्वभाव व वृत्ती समजुन घेऊन रचना केली जाते. सूर्यप्रकाशाच्या दिशेने होणारी झाडाची वाढ याचाही विचार शोका रचेनेचे शास्त्र ठरविताना केलेला आहे. सिरॅमिक किंवा बांबूची पुष्पपात्रे या रचनांसाठी वापरली जातात. मोरीबाना  किंवा नॅगेरी रचनांप्रमाणे यातही शिन, सोय व ताय अशा तीन मुख्य फांद्या व अशिराय वापरले जातात.पिनहोल्डरमध्ये फांद्या लावताना एका सरळ रेषेत सर्व फांद्या लावल्या जातात. हे शोका रचनांचे वैशिष्ठ आहे. सरळ ऊंच वाढणाऱ्या झाडाच्या
खोडाला जशा फांद्या फुटतात त्याप्रमाणे या रचना दिसतात. शिन ही मुख्य फांदी वर्तमानकाळाची, सोय ही भुतकाळाची तर ताय ही भविष्यकाळाची द्योतक मानली जाते. शिन हे पुष्परचनेच्या मध्यभागी, सोय शिनच्या मागे व ताय शिनच्या पुढे लावले जाते. पिनहोल्डरच्या वरचा ३ ते ४ इंच ऊंचीचा जो फांद्यांचा भाग आहे त्याल मिझुगिवा असे म्हणतात. हे आणखी एक शोका रचनांचे वैशिष्ठ!

शोका रचनांचे मुख्य दोन प्रकार केले आहेत.

**१.शोका शोफुताई   २.शोका शिंपुताई**

यावेळी आपण **शोका शोफुताई** रचनांची माहीती घेऊ. पुष्परचनेमध्ये किती प्रकारचे मटेरीअल वापरले आहे त्यानुसार शोका शोफुताई रचनांचे तीन प्रकार होतात.

**१.शोका इश्शुइके -**



या रचनांमध्ये एकाच प्रकारचे मटेरीअल शिन, सोय, ताय व अशिराय साठी वापरले जाते.
ग्लॅडिओला, निशीगंध, लिलीयम, शेवंती, जास्वंदी, गोल्डन रॉड, लार्कस्पर इ. प्रकारचे
मटेरीअल वापरता येते. शिनची ऊंची पुष्पपात्राच्या ऊंचीच्या दोन ते अडीचपट घेतली जाते.
सोयची ऊंची शिनच्या २/३ व तायची ऊंची सोयच्या १/३ घेतली जाते.

२.**शोका निश्शुइके -**



या रचनांमध्ये दोन प्रकारचे मटेरीअल वापरले जाते. पामची पाने व गुलाब,जास्वंद फांद्या व गुलाब/शेवंती इ. मटेरीअल वापरावे. शिन,सोय,तायची ऊंची वरीलप्रमाणे घ्यावी.

यामध्ये शिन व सोयसाठी एकच मटेरीअल आणि तायसाठी दुसरे मटेरीअल वापरावे. दोनपैकी महत्वाचे व उठून दिसणारे असेल ते मटेरीअल शिन व सोयसाठी आणि नाजुक असेल ते तायसाठी वापरावे.

३.**शोका सॅनशुइके -**



या रचनांमध्ये तीन प्रकारचे मटेरीअल वापरले जाते. पाम-ग्लॅडीओला-गुलाब, पाम-निशीगंध-शेवंती अशा प्रकारे निवड करावी. शिन,सोय व तायची ऊंची वरीलप्रमाणेच घ्यावी. तीन प्रकारच्या मटेरीअलची एकमेकांशी रंगसंगती व रिदम साधणे या रचनेमध्ये महत्वाचे आहे. ते साधण्यासाठी पानाफुलांची व पुष्पपात्राची निवड विचारपूर्वक करावी.

**सौ.अरुंधती देशपाडे**
मेंबर, इकेनोबो इकेबाना फ्लोरल आर्ट,जपान
(मराठी विश्व,न्यूजर्सी यांच्या सौजन्याने)

**asdssd@gmail.com**